नि.दि.दावा क्र. ८६/२०१५
विश्वनाथ सोनवणे वि. आनंदा गांगुर्डे
निशाणी : ४२

# प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ आनंदा गंगाधर गांगुर्डे यांचा शपथेवर उर्वरित उलटतपास वादीचे विधिज्ञ श्री. एस. डी. जाधव यांच्यातर्फे सुरु

७. माझ्या गटाची जी मोजणी रजिस्टर क्र. ७२२७/२०२४ अन्वये मी मोजणी केलेली आहे. ती चूकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मोजणीमध्ये माझा गट नं. ४३१ चे क्षेत्र वादीच्या भावाच्या गट नं. ४३२ मध्ये निघाले. मी गट नं. ४३२ चा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की वादीचा व गट नं. ४३२ चा काहीही संबंध नाही. मो.र.क्र. ७२२७/२०२४ मधील मोजणी चूकीची आहे. म्हणून त्याविरुद्ध मी कोणतेही अपिल किंवा अर्ज केला नाही. मोजणीदाराने त्या मो.र.क्र. ७२२७/२०२४ मध्ये चुकीची मोजणी केली म्हणून त्यांच्या वरिष्ठांकडे मी तक्रार केली नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की वादीने केलेल्या मोजणी नंतर मी सदरची मोजणी करुन घेतली. गट नं. ४३२ मध्ये वादीच्या भावाकडे माझे जे क्षेत्र निघाले. ते मागणीसाठी मी कोणताही अर्ज केला नाही. मो.र.क्र. ७२२७/२०२४ मधील मोजणीदाराची साक्ष मी प्रस्तुतकामी नोंदवणार आहे. त्या मोजणीवेळी मी हजर होतो. मात्र लगतचे शेतकरी हजर नव्हते. ती मोजणी दुर्बिणीच्या सहाय्याने केली.

९. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ४३१ मी खरेदी घेतलेला आहे. गट नं. ४३१ खरेदी करतांना त्याची मी मोजणीदाराकडून मोजणी करुन घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या गट नं. ४३० च्या उत्तरेला गट नं. ४१८ आहे. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या गट नं. ४३० च्या पूर्वेकडे माझा गट नं. ४३१ आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ४३० मध्ये वादी व त्याच्या भावाचे वाटप झाले असून दक्षिणेला वादीच्या भावाचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की वाटपानुसार वादी व वादीच्या भावाचे आणेवारीने स्वतंत्र

क्षेत्र देखील लागलेले आहे.

१०. मी तीसगावचा गाव नकाशा पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की गावनकाशामध्ये नदी, तलाव, नाला इत्यादी जे काय असेल ते सर्व दाखवलेले असते. मला आता तीसगावच्या गाव नकाशाची प्रत दाखवण्यात आली. गावनकाशामध्ये माझ्या गट नं. ४३१ मध्ये नाला दाखवलेला नाही. गावनकाशाला **आर्टीकल ए** देण्यात येते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, नकाशामध्ये नाला दाखवला नाही. पंरतु तो जागेवर आहे. गट नं. ४३१ मध्ये नाला आहे हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. तसा कागदोपत्री पुरावा मी दाखल करणार नाही. हे म्हणणे खरे नाही की गट नं. ४३१ मध्ये नाला नसल्यामुळेच त्यासंदर्भात मी कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. वादीच्या ताब्यामध्ये ०.८९ आर क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र आहे हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

११. माझे क्षेत्र कमी भरते अशी मला शंका आल्यामुळे मी माझ्या गट नं. ४३१ ची मोजणी करुन घेतली. मी करुन घेतलेल्या मोजणीमध्ये वरुळी (फिक्स पॉईंट) मिळाला नाही त्यामुळे ती मोजणी मला मान्य नाही. मोजणीमध्ये मला वरुळी मिळाला नाही म्हणून मी अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रस्तुतकामी खोटी कैफियत दिली व खोटा जबाब दिलेला आहे.

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.28 12:22:21 +0530

दि. २८.११.२०२५.
चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चांदवड.